नि.दि.दावा. क्र. ४६/२०२३.

शकुंतला व इतर वि. सोनाबाई व इतर..

MHKO150002722023

## निशाणी क्रमांक २८ खालील आदेश.

**१.** वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्ती करण्यासाठी दिलेला आहे. वादीचे थोडक्यात कथन की, तीने प्रतिवादींच्या विरोधात मनाई हुकूमासाठी दावा दाखल करुन त्यांच्या विरोधात अंतरीम मनाईचा आदेश मिळवलेला आहे. प्रतिवादींनी अंतरीम मनाई आदेश अस्तीत्वात असताना देखील बेकायदेशीरपणे घराचे बांधकाम पुर्ण केलेले आहे. त्याबाबत वादीने कि. दि. अ. क्र.१६/२०२३ दाखल केलेला असून तो प्रलंबित आहे.

**२**. वादीचे पुढे कथन की, प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दि.०९.०७.२०२३ रोजी ग्रा. मि. क्र.७४९ च्या पश्चिमेचा भाग पाडून ग्रा. मि. क्र.७४९ व ७५० मधील खुल्या जागेवरती पुर्व–पश्चिम १० फूट आणि दक्षिण– उत्तूर २५ फूट नवीन घराचे बांधकाम पुर्ण केले आहे. त्या अनुषंगाने वादीला दाव्यामधील दुरुस्ती करुन दाव्यातील मथळयासह परिच्छेद क्र.८/अ अर्जातील कथना प्रमाणे नव्याने दाखल करुन आवश्यक असणारी परिच्छेद क्र.१० व १४ मध्ये दुरुस्ती करण्यासाठी परवानगी देण्याची मागणी केली आहे. वादीची मागणी दाव्याच्या अंतिम निर्णयासाठी आवश्यक असून दाव्यामध्ये कोणताही बदल करणारी नसल्यामुळे तसेच दावा प्रलंबित असताना घडलेल्या घटनांबाबतची असल्यामुळे अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**३**. प्रतिवादींनी अर्जाच्या अंतिम पानावरती लेखी म्हणणे सादर करुन त्यांनी कोणत्याही प्रकारचे बांधकाम केलेले नसल्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**४**. वादी व प्रतिवादीच्या वकिलांचा विस्तृत युक्तिवाद ऐकला. वादीच्या वकिलांनी प्रस्तूत अर्जाद्वारे वादीने केलेली मागणी दाव्याच्या अंतिम न्यायनिर्णयास उपयुक्त असून मूळ दाव्यामध्ये कोणताही बदल करणारी नसून दावा प्रलंबित असताना घडलेल्या घटनांबाबत असल्यामुळे अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे. याउलट, प्रतिवादींच्या वकिलांनी

दावा प्रलंबित असताना बांधकाम केल्याचे नाकारुन वादीने त्याच्या कथनाप्रमाणे दि.०९.०७.२०२३ रोजी बांधकाम पुर्ण केल्याचे कथन करुन देखील प्रस्तूत अर्ज विलंबाने सादर केलेला असल्यामुळे नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

५. वादीच्या कथना प्रमाणे त्याने मागितलेली प्रस्तावित सुधारणा दावा प्रलंबित असताना घडलेल्या घटनांबाबतची असून दाव्याच्या अंतिम न्यायनिर्णयासह कायदेशीर प्रक्रियेची गुंतागुंत टाळण्यासाठी मंजूर करण्याची आवश्यक आहे. त्याप्रमाणे वादीने प्रतिवादींनी दि. ०९.०७.२०२३ रोजी बांधकाम केल्याचे कथन करुन देखील विलंबाने अर्ज सादर करण्याचे कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही. निश्चितच न्यायालयाने दुरुस्तीचा अर्ज मंजूर करताना त्यातील गुणदोषांचा विचार करणे आवश्यक नसून केवळ प्रस्तावित दुरुस्ती अंतिम आदेशासाठी आवश्यक आहे किंवा नाही ते पाहणे गरजेचे आहे.

६. प्रतिवादींनी दावा प्रलंबित असताना बांधकाम केले आहे किंवा नाही ही बाब अंतिम पुराव्याने सिध्द होणार आहे. त्यासाठी वादीला दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी देणे न्यायोचित ठरते. सदर प्रकरणामध्ये अद्याप पर्यंत वादीने पुरावा दाखल केलेला नाही. तसेच वादीचा अर्ज मंजूर केल्यामुळे दाव्यामध्ये कोणताही बदल होणार नाही. वादीने मागितलेली दुरुस्ती त्याच्या पुर्वीच्या मागणीशी संबंधित आहे. याउलट, वादीचा अर्ज नामंजूर केल्यास दाव्यांची गुंतागुंत वाढण्याची शक्यता आहे. सबब, वरील विवेचना वरुन न्यायाच्या दृष्टीने अर्ज मंजूर करणे आवश्यक असून वादीने केलेल्या विलंबा बाबत त्याला दंड करणे न्यायोचित ठरते. सबब, मी वरील विवेचनावरुन खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

## आदेश

१. अर्ज ५००/- रुपयांच्या दंडावरती मंजूर करण्यात येतो.

२. वादीने पुढील तारखेला विधी सेवा, आजरा येथे दंडाची रक्कम जमा केल्यानंतर अर्जातील मागणी प्रमाणे दाव्यात दुरुस्ती करुन आवश्यक त्या प्रती सादर कराव्यात.

**३**. प्रतिवादींना वादीने दुरुस्ती केल्यानंतर आवश्यकतेप्रमाणे त्याच्या लेखी कैफियतीमध्ये बदल करण्याची सवलत असून त्यांनी विनामागणी पुर्तता करावी.

**४**. वादी व प्रतिवादींनी आदेशाची नोंद घेऊन पुर्तता करावी.

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

**(आर. पी. थोरे)**

जे. ओ. कोड–एम.एच.०२८९७

दिनांक – २०.०१.२०२५. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.